महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळातील अधिकारी/कर्मचारी यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : इमाव-२०१७/प्र.क्र.४४/महामंडळे,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४००० ३२.
दिनांक : १६ सप्टेंबर, २०१९.

वाचा : व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ यांचे पत्र क्र.इमाविवि- २०१६/प्रशासन/३२०६, दि.१५ जानेवारी, २०१६.

शासन निर्णय

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळातील ३८ पात्र अधिकारी/ कर्मचारी यांना महामंडळाच्या संचालक मंडळाने केलेल्या ठरावानुसार दि.०१ एप्रिल, २०१८ पासून सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

(१) सद्यस्थितीत महामंडळास ६ वा वेतन आयोग लागू आहे. सबब महामंडळाने वित्त विभाग/शासनाकडून निर्गमित करण्यात आलेले उदा.दि.१.४.२०१०, दि.५.७.२०१०, दि.१.७.२०११, दि.६.९.२०१४, दि.१०.२.२०१५, दि.२३.१२.२०१५, दि.९.१२.२०१६, दि.११.५.२०१७ व वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय/परिपत्रकातील अटी व शर्तीनुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेची अंमलबजावणी करावी.

(२) महामंडळाने सन २०१६-१७, २०१७-१८ पर्यंतचे वार्षिक लेखे नजीकच्या अधिवेशनात सादर करावेत. तसेच त्यापुढील प्रत्येक वर्षाचे वार्षिक लेखे पूर्ण करुन ते विहित कालमर्यादेत विधानमंडळासमोर सादर करावेत.

(३) महामंडळातील रिक्त पदे भरणे/नवीन पदे निर्माण करणे, याबाबतची कार्यवाही शासनाच्या मान्यतेने करणे बंधनकारक राहील.

(४) महामंडळास सहावा वेतन आयोग लागू करण्यात आलेला असून यापुढील वेतन आयोग लागू करण्यापूर्वी त्यास विभागामार्फत शासनाची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील.

(५) महामंडळाने केंद्र व राज्यस्तरीय यंत्रणेशी आवश्यक समन्वय करुन राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत उचित कालबध्द कार्यक्रम तयार करावा. तसेच, योग्य ती कार्यकुशलता, उपाययोजना, अंमलबजावणी करुन कर्जवसूलीच्या टक्केवारीत उल्लेखनीय वाढ करावी.

(६) महामंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्यावरील खर्चासाठी राज्य शासनामार्फत नियमितपणे व्यवस्थापकीय अनुदान देण्यात येते. त्यामुळे सदर योजना लागू केल्यास राज्य शासनावर दरमहा अंदाजे रु.२.७० लक्ष इतका आर्थिक भार येणार असून एप्रिल, २०१८ ते जुलै, २०१९ या कालावधीतील थकबाकीपोटी अंदाजे रु.४३.४० लक्ष इतका खर्च येणार आहे. हा खर्च भागविण्यासाठी शासनामार्फत देण्यात येणाऱ्या व्यवस्थापकीय अनुदानात वाढ करावी लागेल. त्यामुळे सदर प्रस्तावास विभागाने शासनाची मान्यता घ्यावी. सद्यस्थितीत महामंडळ नफ्यात चालत आहे, तथापि सदर योजना लागू केल्यामुळे महामंडळ भविष्यात तोटयात जाणार नाही, याची जबाबदारी प्रशासकीय विभाग व महामंडळ यांची राहील.

(७) शासन निर्णय दि.२५ एप्रिल, २०१९ मध्ये नमूद केल्यानुसार महामंडळाने त्यांचे अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी स्वतंत्र सेवा नियम तातडीने तयार करुन त्यांस शासनाची मान्यता प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

२. यासाठी होणारा खर्च मागणी क्र. झेडजी-३, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०३, मागासवर्गीयांचे कल्याण, १०२, आर्थिक विकास, (०३) स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान (०३) (०१) महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्ग वित्त व विकास महामंडळाला सहाय्यक अनुदान (अनिवार्य) (२२२५ ई ८५७), ३६, सहायक अनुदाने (वेतन) या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५२/सा.उ., दिनांक २२ जुलै, २०१९ अन्वये वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०९१६१४०६३८३७२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.09.16 14:17:38 +05'30'

(भा. र. गावित)

सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :

१) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर.
२) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई.
४) कक्ष अधिकारी (सा.उ.), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प/रोखशाखा), विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) स्वीय सहायक, प्रधान सचिव (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
७) निवडनस्ती (महामंडळे).

*****